# विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय

## बचतधाम विश्रामगृह समिती
## अल्प मुदतीची जाहीर सूचना

या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या सेक्टर १०, सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहाकरीता व्यवस्थापक, सुरक्षारक्षक व सफाई कामगार यांच्या सेवांची आवश्यकता आहे.

उक्त सेवांचा पुरवठा करण्यास इच्छुक एजन्सी धारकांकडून दिनांक २६.०२.२०२१ पर्यंत दरपत्रक मागविण्यात येत आहेत. याबाबतची अधिक माहिती, अर्जाचा नमुना, इत्यादी (www.http://divcomkonkan.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही /-**

उप आयुक्त (सामान्य प्रशासन) कोंकण विभाग
तथा सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती
(संपर्क क्र.०२२-२७५७१५०१)

साशा/कक्ष-१/इमारत/बचतधाम-देखभाल/२०२१
दिनांक : १५.०२.०२०२१

Scanned with CamScanner

# बचतधाम विश्रामगृह येथील व्यवस्थापक, सुरक्षा रक्षक व सफाई कामगार यांच्या सेवा पुरविण्याबाबत माहिती...

❖ आवश्यक सेवांचा तपशील खालीलप्रमाणे-:

| अ.क्र. | सेवा | आवश्यक मनुष्यबळ | तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | २ | १२ x १२ तासांकरीता | सदरहू सेवांचा कालावधी दिनांक ०१.०४.२०२१ ते दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत असेल. |
| २ | सुरक्षारक्षक | २ | १२ x १२ तासांकरीता | |
| ३ | सफाई कामगार (पुरुष) | ३ | रा.०६.०० ते दु.२.०० (२) दु.०२.०० ते रा.१०.०० (१) | |

## दरपत्रक संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात दरपत्रक समक्ष दिनांक १५.०२.२०२१ ते दिनांक २६.०२.२०२१ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावीत. त्यावर *बचतधाम विश्रामगृह येथील व्यवस्थापक, सुरक्षा रक्षक व सफाईगार यांच्या सेवा पुरविण्याबाबत दरपत्रक* असा स्पष्ट उल्लेख असावा. सदरहू दरपत्रक अर्जासोबत **लिफाफा अ)** मध्ये आवश्यक ती माहिती कागदपत्रासह व **लिफाफा ब)** मध्ये दरपत्रक नमुद करुन **दोन स्वतंत्र** मोहोर बंद लिफाफे या कार्यालयास सादर करावेत. दरपत्रक दिनांक ०१.०३.२०२१ रोजी दुपारी ०४.०० वाजता उघडण्यात येईल. दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रक धारक यांना हजर राहता येईल. |
| २ | दरपत्रकधारक यांनी इसाऱ्याची रक्कम रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावी. इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर इमारत कक्षाकडून प्राप्त झालेली पावती दरपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ३ | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी दरपत्रकधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरावा लागेल, तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा या कार्यालयास सादर करावा लागेल. |
| ४ | दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे, चुकून तसे करावे लागल्यास पुर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार बचतधाम समितीने राखून ठेवले आहेत. |
| ५ | यशस्वी दरपत्रकधारकास दरपत्रक सफल झाल्याचे कळल्यापासून सुरक्षा अनामत ठेव रक्कम रुपये ५०,०००/- या कार्यालयाकडे राष्ट्रीयकृत बँकेचे डी. डी. व्दारे भरणा करावी. डी. डी. ***बचतधाम समिती कोंकण भवन*** या नावाने काढावा. |
| ६ | कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग तथा अध्यक्ष, बचतधाम विश्रामगृह समिती यांना राहतील. |
| ७ | बचतधाम विश्रामगृहाच्या मालमत्तेचे कोणत्याही स्वरुपाचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील व अशी नुकसान भरपाई एक महिन्याच्या आत करुन देणे बंधनकारक राहील. |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| ८ | दरपत्रकधारक यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या व्यवस्थापक यांनी दिनांक ०१.०४.२०२१ पासून हिशोब नोंदवही ठेवावी व प्रत्येक दिवशी जमा होणारी कक्ष आरक्षणाची रक्कम दुसऱ्या दिवशी सकाळी ११.०० वाजता बचतधाम समितीच्या भारतीय स्टेट बँक कोंकण भवन शाखेत जमा करुन त्याबाबची पावती इमारत शाखेकडे सादर करणे आवश्यक राहील. |
| ९ | व्यवस्थापक यांनी बचतधाम विश्रामगृहात येणाऱ्या शासकीय, निमशासकीय अधिकारी / कर्मचारी त्यांचेकडून शासनाचे ओळखपत्र व आधारकार्ड घेणे बंधनकारक राहील. |
| १० | बचतधाम विश्रामगृहाचे कक्ष आरक्षणापोटी जमा रक्कम व पावती पुस्तक याचा ताळमेळ होणे आवश्यक आहे. जर हिशोबात फरक निदर्शनास आला तर कमी असणाऱ्या रक्कमेचा भरणा संबंधित एजन्सीधारकास या कार्यालयाकडे करणे बंधनकारक राहील. |
| ११ | बचतधाम विश्रामगृह येथे नेमण्यात आलेल्या सुरक्षारक्षकास ओळखपत्र, गणवेश व सुरक्षा साहित्याचा पुरवठा हा दरपत्रक धारकांनी करण्याचा आहे. |
| १२ | बचतधाम विश्रामगृह येथे नेमण्यात आलेल्या सफाईगार व्यक्तीस ओळखपत्र, गणवेश व स्वच्छतेच्या साहित्याचा पुरवठा हा दरपत्रक धारकांनी करण्याचा आहे. |
| १३ | साफसफाईसाठी वापरण्याचे सर्व साहित्य दरपत्रकधारकाने उपलब्ध करुन देण्याचे आहे. त्या साहित्याचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे. कोणतेही मशिनरी चार्जेस दिले जाणार नाहीत. |
| १४ | स्वच्छतेमध्ये बचतधाम इमारतीमधील सर्व कक्ष, सभागृह, जीने, व्हरांडे, टेरेस, प्रसाधनगृह व इमारती सभोवतालचा सर्व परिसर रोजचे रोज स्वच्छ करणे व झाडांना पाणी घालणे आवश्यक राहील. |
| १५ | कामाचे देयक प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत धनादेशाव्दारे बँक खात्यात जमा करण्यात येईल. |
| १६ | दरपत्रक मंजूर करताना व्यवस्थापक, सुरक्षारक्षक व सफाई कामगार यांच्या सेवांचा दरपत्रकात नमूद केलेला एकत्रित प्रती महिना दर विचारात घेण्यात येईल. |
| १७ | उक्त सेवांबाबत दरपत्रकधारकाने नेमलेल्या व्यक्तींबाबत भविष्यात काही अपघात, जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच त्याबाबत दरपत्रकधारक व संबंधित व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. |
| १८ | दरपत्रकधारकास वरील सर्व नियम व अटी मान्य असल्यास त्यांनी याबाबत रुपये १००/- च्या बॉन्ड पेपरवर लेखी करारनामा करुन या कार्यालयास सादर करावा. |

सही/-
(मनोज रानडे)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग
तथा सदस्य बचतधाम विश्रामगृह समिती

Scanned with CamScanner

# अर्ज नमुना

दिनांक :-

प्रति,
मा.अध्यक्ष,
बचतधाम समिती तथा
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

विषय :- बचतधाम विश्रामगृह येथील व्यवस्थापक, सुरक्षा रक्षक व सफाई कामगार (पुरुष) यांच्या सेवा पुरविण्याबाबत...

महोदय,

आपले कार्यालयाकडील जाहीर सूचना क्रमांक साशा/कक्ष-१/इमारत/बचतधाम-देखभाल/२०२१ दिनांक १५.०२.२०२१ अन्वये उप आयुक्त(सामान्य प्रशासन), कोकण विभाग तथा सदस्य बचतधाम विश्रामगृह समिती यांनी आपले कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या माहिती, नियम व अटीनुसार मी व्यवस्थापक, सुरक्षा रक्षक व सफाई कामगार(पुरुष) या सेवांबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

मी दरपत्रकाबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

| अ.क्र. | आवश्यक माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव | |
| २ | मोबाईल क्रमांक व<br>ई-मेल आयडी | |
| ३ | दरपत्रकधारक एजन्सीचा संपूर्ण पोष्टाचा पत्ता | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| ६ | सदर व्यवसायासाठी आवश्यक असलेले शासकीय व अन्य परवाने क्रमांक व दिनांक<br>(सोबत प्रती जोडणे आवश्यक आहे) | |
| ७ | आधारकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |
| ८ | पॅनकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |

आपला विश्वासू,

(दरपत्रकधारकाचे नाव व स्वाक्षरी)



Scanned with CamScanner

# अर्ज नमुना

दिनांक :-

प्रति,
मा.अध्यक्ष,
बचतधाम समिती तथा
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

विषय :- बचतधाम विश्रामगृह येथील व्यवस्थापक, सुरक्षा रक्षक व सफाई कामगार (पुरुष) यांच्या सेवा पुरविण्याबाबत...

महोदय,

आपले कार्यालयाकडील जाहीर सूचना क्रमांक साशा/कक्ष-१/इमारत/बचतधाम-देखभाल/२०२१ दिनांक १५.०२.२०२१ अन्वये उप आयुक्त(सामान्य प्रशासन), कोकण विभाग तथा सदस्य बचतधाम विश्रामगृह समिती यांनी आपले कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या माहिती, नियम व अटीनुसार मी व्यवस्थापक, सुरक्षा रक्षक व सफाई कामगार(पुरुष) या सेवांबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

मी दरपत्रकाबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

| अ.क्र. | आवश्यक माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव | |
| २ | मोबाईल क्रमांक व<br>ई-मेल आयडी | |
| ३ | दरपत्रकधारक एजन्सीचा संपूर्ण पोष्टाचा पत्ता | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| ६ | सदर व्यवसायासाठी आवश्यक असलेले शासकीय व अन्य परवाने क्रमांक व दिनांक<br>(सोबत प्रती जोडणे आवश्यक आहे) | |
| ७ | आधारकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |
| ८ | पॅनकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |

आपला विश्वासू,

(दरपत्रकधारकाचे नाव व स्वाक्षरी)



Scanned with CamScanner

# RATE QUOTATION

As per **QUOTATION** NOTICE No.GAD/DESK-1/ BUILDING/BACHATDHAM-MAINTAINANCE/2021
Date 15.02.2021 For Bachatdham Rest House,
CBD Belapur, Navi Mumbai

NAME OF THE AGENCY :-

Full Address :-

Mobile No. :-

E-mail Id :-

| **Sr. No.** | **Type of Manpower** | **Gross Salary (Rs. Per Month)** | **Leavy Amount (Rs. Per Month)** | **Total Amount (Rs. Per Month)** |
|---|---|---|---|---|
| 1 | Housekeeper (M) (3) | | | |
| 2 | Security Guard (2) | | | |
| 3 | Manager (2) | | | |
| | | | Service Charges | |
| | | | GST Charges | |
| | | | Material Charges Per Month | |
| | | | Total Amount | |
| | | | | |

**Name and Signature of Applicant**



Scanned with CamScanner